REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 8 | MAY - 2022

# 'अंमली पदार्थ : स्वरुप व परिणाम'

प्रा. डॉ. बनसोडे एस.एस.
समाजशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिव शाहू महाविद्यालय, सरुड, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर.

## प्रस्तावना-



हल्लीच्या काळातील शहरातील जीवन तणावग्रस्त बनत चालले असून पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण यामुळे अंमलीपदार्थ व धोकादायक पदरार्थांच्या व्यापाराचे भारतातील प्रमाण चिंताजनक बनले आहे. भौगोलीक स्थानामुळेही भारत हा अंमली पदार्थाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातीलएक महत्त्वाच दुवा बनले आहे. भारतात नोर्कोटिक्स कंट्रोल ब्युरो या मुख्य संस्थेव्यतीरिक्त कस्टम, एक्साईज, अंमलबजावणी मंत्रालय या केंद्रिय संस्था आणि राज्य पोलीस दले अंमली पदार्थाविरुद्ध कारवाया करित असतात पण पकडली जाणारी ड्रग्ज हिमनगाचे केवळ टोक असते.

मादक पदार्थांचा गैरवापर वा सेवन करणे म्हणजे एकीकडे ते नितिभ्रष्ट वर्तन आहे तर दुसरीकडे तो एक सामाजिक प्रश्न आहे. सामाजिक समस्येच्या दृष्टिकोनातून विचार करता अंमली पदार्थाचे सेवन व व्यापार हा समाजाला हानिकारक ठरतो. अनेक देशातही मादक पदार्थांचा वापर ही सामाजिक समस्या मानली गेली आहे. भारतात ७० च्या दशकापासून अशा अंमलीपदार्थांचा शिरकाव झाल्याचे मानले जाते. पण त्यावेळी त्याचे स्वरुप व परिणाम फारसे जाणवत नव्हते. सद्यस्थितीत मात्र अशा अंमली वा मादक पदार्थांचे स्वरुप व परिणाम भयंकर स्वरुपाचे असल्याचे दिसून येत आहे. असा पदार्थांचा गैरवापर केवळ द्वाड मुले, कनिष्ट वर्गिय लोक यांच्यापुरता मर्यादित राहिला नसून उच्च वर्गिय मुलांची ती फॅशन ठरत चालली आहे.

भारतात अनादि काळापासून अंमली पदार्थ व त्याचे परिणाम ज्ञात होते. आत्ताही खेड्यापाड्यात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनाही "गांजा चारला तर गुरे धष्टपुष्ट होतात" हे माहित असते किंवा घरात लहान मूल असेल तर शेतमजुरी करणारी बाई बाळाच्या टाळूला दाण्याएवढी अफू चिकटवून बिनघोर कामाला जात असे.

जुलियन या समाजशास्त्रज्ञाने मादक पदार्थांची व्याख्या करताना सांगितले आहे की, मादक पदार्थ ही संज्ञा अशा रासायनिक घटकांच्या संदर्भात वापरली जाते की, जो घटक शारीरिक कार्ये, मनःस्थिती, समज आणि जाणिवा यांच्यावर परिणाम करतो. या घटकांचा दुरुपयोग व सेवन होण्याची दाट होण्याची असते. तसे झाल्यास त्याचा व्यक्तिवर व समाजावर मोठा हानिकारक परिणाम होण्याची शक्यता असते. मानवी शरीर जेंव्हा सतत मादक पदार्थांची मागणी करते व त्या मागणीची पूर्तता करण्यासाठी मनुष्य मादक पदार्थाचे सेवन वारंवार करतो तेव्हा तो मनुष्य मादक पदार्थांचा व्यसनी मनुष्य आहे असे म्हटले जाते. अशा मनुष्याचे शरीर मादक पदार्थांची मागणी करते व जर त्याने मादक पदार्थांचे सेवन बंद केले तर मनुष्याच्या शरीराच्या कार्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो किंवा अशा व्यक्ति आपला प्राणही गमावतात.

अफू, गांजा, काकेन, हेरॉईन हे सर्वपरिचित पदार्थ आहेत. यातील अफूपासून गर्द, हेरॉईन तयार होते. कोकोंच्य पानांपासून कोकेन तयार होते. इतर अंमलीपदार्थामध्ये मेथ्यक्युलॉन, ॲम्फेटामाईन, मेथॲम्फेटाईन इ. चा समावेश होतो. याशिवाय बटण गोळ्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ट्रायनॉक्स गोळ्या तसेच रेक्सकॉफ या खोकल्यावरील औषधाचा त्यात समावेश होतो.

### उद्देश-

प्रस्तूत शोधलेखात पुढील उद्देशांचा समावेश करण्यात आला आहे.

१. प्रमुख अंमली पदार्थाचे अध्ययन करणे.
२. अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तिंवर होणारे परिणाम अभ्यासणे.
३. अंमली पदार्थांची महाराष्ट्रातील सद्यस्थिती अभ्यासणे.
४. अंमली पदार्थाविरोधी कायद्याची माहिती करुन घेणे.

### गृहितकृत्ये-

प्रस्तूत शोधलेखात खालील गृहीतकृत्यांचा समावेश करण्यात आला आहे.

१. अंमली पदार्थाच्या सेवनाचे समाजावर दूरगामी परिणाम होत आहेत.
२. अंमली पदार्थ प्रतिबंध विविध कायदे करण्यात आले आहेत.
३. प्रमुख अंमली पदार्थाची माहिती जाणून घेणे.

### संशोधन पद्धती-

या संशोधन पद्धतीत प्राथमिक स्त्रोत व द्वितीय स्त्रोतांचा उपयोग करुन माहिती गोळा करण्यात आली आहे. प्राथमिक स्त्रोतात प्रत्यक्ष अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या काही व्यक्तींची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन संवाद साधून तसेच व्यसनमुक्ती केंद्राशी प्रत्यक्ष भेट देऊन अंमली पदार्थाच्या सेवनाचे परिणाम जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर द्वितीयक स्त्रोतांमध्ये वर्तमानपत्रे, मॅग्झीनस्, सोशल मिडीया, पुस्तकांचा उपयोग करुन घेतला आहे.

### विश्लेषण-

अंमली पदार्थाचा समाजातील वापर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. उच्चभ्रू समाजापासून ते अगदी कनिष्ठ वर्गीयांपर्यत या पदार्थाने हातपाय पसरले आहेत. तरुणाईचा अशा गोष्टीकडे जास्त कल वाढला आहे. तर उच्चभ्रू लोकांचे अनुकरण मध्यमवर्गिय व कनिष्ठ वर्गांमध्ये करण्याचे वाढले आहे. सुरवातीस त्यापासून मिळणारा क्षणिक आनंद धुंद, कैफ, नशा, हळू हळू व्यक्तीस मगरमिठीत घेते आणि व्यक्ती आपल्या प्राणासही मुकते. एकदा याचे व्यसन जडले की त्यातून सुटका होणे जवळपास अशक्य बनुन जाते. अंमली पदार्थात असणारे विशिष्ट घटकच व्यक्तीला व्यसनाधिन बनवतात आणि मग त्यातून ती व्यक्ति बाहेर पडू शकत नाही. यात त्या व्यक्तीचे, त्याच्या कुटुंबियाचे आणि समाजाचे भरुन न येणारे नुकसान अकल्पनिय असते. अशा काही अंमली पदार्थ व त्यांच्या मानवी शरीरावर होणाऱ्या परिणामांची चर्चा करुया.

#### १. गांजा-

गांजाचे झाड लावणे बेकायदेशीर असले तरीही चोरुन अनेकजन शेतात गांजा लावतात. पैशाचे अमिष असल्याने गांजा अनेक ठिकाणी होतो. गांजाचे झाड अंबाडी वर्गातले असून त्याच्यातून वाहणारा रस (डिंक) हा मादक आहे. गांजा हे मुळात एक औषधी झाड आहे. यांच्या मादी जातींच्या झाडापासून जो चीक निघतो त्यास गांजा असे म्हणतात. कोवळ्या फांद्यावर राळेसारखा थर येतो त्यास चरस म्हणतात. पाने व टिकशा मिळून भांग तयार होते. गांजा व भांग जुनी असल्यास निरुपयोगी असतो. कारण त्यात उडून जाणारे तेलद्रव्य असते, तेच मुख्य काम करते. हे तेल व राळ दारुत किंवा तुपात मिसळते पण पाण्यात नाही.

धुम्रपान व सेवन या दोन्हींद्वारे गांजा शरीरात घेतला जातो. याच्या सेवनामुळे स्मृतीदोष उद्‌भवणे, संतूलन राखणे, धडधड वाढणे तसेच मेंदूच्या आकारात व क्रियाशीलतेत बदल घडत जातो. अशा व्यक्तींना हृदयविकाराचा झटका येण्याचीही शक्यता अधिक असते. याच्या सेवनाने तोंड व घसा याचा प्रादूर्भाव होतो. तसेच सुरवातीस कफ होऊन छातीत दुखणे व नंतर कफचे प्रमाण वाढतच जाऊन श्वसनाचे विकास उद्‌भवतात. यातील THC या घटकामुळे संबंधित व्यक्तिचे वजन कमी होऊन वेगवेगळे आजार किंवा संसर्ग जडू शकतात. याव्यतिरिक्त डोळे लाल होणे, चिडचिड होणे, चालताना त्रास होणे, झोप न येणे, भास होणे इत्यादी लक्षणेही दिसून येतात. तर गांजाचे व्यसन थांबवल्यास अस्वस्थता, चिंताग्रस्तता, चयापचयाचे त्रास, पोटात दुखणे, वजन घटने व हातांना कंप सुटणे इत्यादी त्रासाला सामोरे जावे लागते.

VOLUME - 11 | ISSUE - 8 | MAY- 2022

### २. अफू-

गांजाप्रमाणे अफू हे ही मुळात एक औषधी म्हणून उपयुक्त आहे. ते गांजापेक्षा जास्त प्रभावी आहे. अफूची झाडे उत्तर भारतात जास्त आहेत. याच्या बोंडापासून निघालेला चिक सुकल्यानंतर अफू होतो. बोंडेपण वापरली जातात. तसेच त्यातले बी (खसखस) खूप वापरले जाते. अफूमध्ये वेदनाशामक आणि तापशामक अशी दोन द्रव्ये असतात. यातील पहिले द्रव्य (मॉर्फिन) हे अत्यंत उपयुक्त आहे. याने मेंदूवर सुरुवातीस उत्तेजन पण नंतर निद्रा आणणारा परिणाम होतो. एकूण वेदना सहन करण्याची क्षमता वाढते. उत्साह, कामवासना, विचारशक्ती इत्यादी वाढतात पण हे सगळे कमी मात्रा दिल्यावर. जास्त मात्रा दिल्यावर श्वसनक्रिया, ह्रदयक्रिया बंद पडून मृत्यू येण्याचा संभव असतो. नेहमी अफूचे सेवन करणारी व्यक्ती पुढे अफूवर पूर्णतः अवलंबून राहू लागते. अफूच्या व्यसनामुळे समतोल आहार घेतला जात नाही व त्यामुळे शारीरिक अशक्तपणा जाणवतो. शरीरातील विविध क्रियासंस्था आपली क्रियाशीलता वाढवण्यासाठी अफूचा वापर करु लागतात. अफू घेणे एकदम थांबवले तर शरीरातील स्नायू आकूंचन पावणे, पायात गोळे येणे, कंबरदुखी व अंगाला थरथरी सुटणे अशी लक्षणे दिसून येतात. नाक वाहणे, रक्तदाब वाढणे इत्यादी सर्वसाधारण लक्षणे आहेत. अफूचे व्यसन थांबवल्यानंतरही अफूची इच्छा प्रबळ स्वरुपाची असते.

### ३. हेरॉईन-

हे अफूपासूनच बनवलेले अत्यंत मादक द्रव्य आहे. शुद्ध रुपात ते पांढरे असते. अफू किंवा गर्द खाल्ली किंवा ओढली जाते. हे हेरॉईन शरीरात घेतल्यानंतर काही क्षणातच ते मेंदूपर्यंत पोहचते व तेथेच हेरॉईनचे मॉर्फिनमध्ये रुपांतर होते. हेरॉईनच्या वापरानंतर संपूर्ण शरीरावर वेगळ्या प्रकारचा बदल अनुभवला जातो. तोंड वारंवार कोरडे पडणे, अन्नावरची वासना जाणे, उलट्या होणे, सर्व अंगावर खाज सुटणे, व्यक्तीच्या विचार व वर्तनात नकारात्मकता येणे, इंजेक्शनद्वारे हेरॉईन घेतल्यामुळे शरीरातील शीरा सडत जाणे तसेच यकृत व मूत्राशयावरही याचा जबरदस्त आघात होतो. हेरॉईनचे सेवन करणाऱ्या व्यक्तिंच्या मज्जासंस्थेच्या पेशी या मादक पदार्थाच्या अंमलाखाली काम करायला शिकतात. पुढे अशी अवस्था येते की, हा पदार्थ घेतल्याशिवाय काम करणे अशक्य होते आणि हा पदार्थ नाही मिळाला तर हातापायाला कंप सुटतो. पोटात जीवघेण्या कळा उद्भवतात. तसेच रक्तदाब व ह्रदयक्रिया मंदावणे ही लक्षणे दिसून येतात.

### ४. रॉक कोकेन-

रॉक कोकेन जे सामान्यतः क्रॅक म्हणून ओळखले जाते. हे शुद्ध कोकेनपेक्षा खुप कमी महाग असते. मात्र इतके व्यसन लावणारे असते की याचा वापर करणारे आपल्या व्यसनाचा खर्च करता करता आर्थिक संकटात सापडतात. शुद्ध कोकेनमध्ये इतर कांही रसायने मिसळून स्फटिक तयार करतात. हे स्फटिक नंतर जाळून त्याच्या वाफा हुंगतात. क्रॅक तीव्रपणे व्यसन लावणारे व अतिशय धोकादायक असते. नेहमीच्या कोकेनप्रमाणेच याचेही परिणाम असतात. याला वापरणारी व्यक्ती अतीशय तरतरीत आणि अनियंत्रीत होते. तरुण व्यक्तीच्या बाबतीत हि विशेष काळजीची गोष्ट आहे. कारण अशी व्यक्ती असुरक्षित शरीरसंबंध तसेच यांचा ड्रग्ज पुरविण्यासाठी एखाद्या गुन्ह्यात सापडण्याची शक्यताही असते. क्रॅक सामान्यपणे तांब्याच्या तारेचा फिल्टर बसविलेल्या ग्लासच्या नळीतून ओढतात. क्रॅकच्या आहारी गेलेल्या व्यक्तीच्या रक्तवाहिन्या आकुंचन पावणे, ताप येणे, उच्च रक्तदाब, तसेच हे व्यसन नाकाद्वारे केले गेले तर श्वसनाचे विविध विकार, छातीत दुखणे, फुफ्फुसांचे कार्य कमी होणे, नाकातून रक्त येणे असे दुष्परिणाम दिसून येतात. इतकेच नव्हे तर यकृताचे कार्य थांबण्याची शक्यता, मज्जासंस्थेवर परिणाम होणे, ह्रदयरोग असे विपरीत परिणाम होतात. बंडखोरपणा वाढणे, चित्तवृत्तीत सातत्य नसणे, उलट्या होणे, भिती वाटणे, छातीत धडधड होणे, भ्रम होणे अशा समस्यांनाही सामोरे जावे लागते.

### ५. शुगर्स-

शुगर्स हा एकप्रकारचा मीटर ड्रग आहे, ज्यामध्ये साधारणपणे टाकाऊ कोकेन आणि टाकाऊ हेरॉईन आणि शक्यतो स्ट्रिकनीन सारखी (उंदराचे विष) इतर रसायने असल्याचे बोलले जाते. हा ड्रग पावडर स्वरुपात असून याला वापरणारे एक पत्र्याचा तुकडा पावडरवर ठेवून त्या पेटवतात आणि एका नळीद्वारे याच्या वाफा नाकावाटे आत घेतात. ड्रग लागलीच त्यांना निश्चिंत करते आणि त्यांना झोप येवू लागते. या गुंगीच्या अवस्थेत असताना संबंधित व्यक्तीचा गैरवापर किंवा त्यांना दुखापत होण्याचा धोका असतो. शुगर्स महाग नसतात मात्र हे तीव्र व्यसनशील असून त्यांची लगेचच सवय होते.

### ६. एलएसडी-

एलएसडीचे व्यसन करणाऱ्या व्यक्तिच्या शरीरावर पुरळ उठणे, ताप येणे, हृदयाच्या स्पंदनात व रक्तदाबात वाढ होणे, घाम येणे, अंगाला कंप सुटणे, तोंड कोरडे पडणे तसेच याचे अतिसेवन केल्यामुळे सायकोसिस किंवा स्किझोफ्रेनिया असे मानसिक आजार जडू शकतात. यातून जीवन नैराश्याकडे झोकले जाते. याचे सेवन करणाऱ्या व्यक्तीला वेळेची व वास्तविकतेची जाण नसते.

### ७. मॉर्फिन-

मॉर्फिनचे वारंवार सेवन केले गेल्यास भूक मंदावणे, लैंगिक भावना कमी होणे, बद्धकोष्टता आणि वारंवार खोकल्याचा त्रास जाणवतो. जर महिला या व्यसनाच्या आहारी गेल्या असतील तर त्यांना मासिकपाळीच्या समस्या उद्‌भवतात. तर गरोदर महिलेच्या गर्भावरही याचे परिणाम होतात. असे जन्माला आलेले बाळ पुढे व्यसनाधिन होऊ शकते. डोळ्याच्या बाहुल्या आकुंचन पावणे, थकवा येणे, बुशुद्धावस्था येणे, नाडीची गती मंदावणे, रक्तदाब कमी होणे तसेच फुफ्फुसांमध्ये पाणी होणे असे दुष्परिणाम संभवतात. यांच्या व्यसनामुळे व्यक्तीला वास्तविकतेचे भान राहत नाही. त्याचबरोबर डोळ्यातून पाणी येणे, जांभया देणे, अचानक थंडी वाजून ताप येणे अशी शारीरिक लक्षणेही दिसतात.

### ८. रोहीप्रॉल-

रोहीप्रॉल हे डेट रेप ड्रग म्हणूनही ओळखले जाते. याचे कारण म्हणजे या ड्रगच्या परिणामी एखाद्या मुलीला किंवा स्त्रीला आपल्याला कोणीतरी लैंगिकदृष्ट्या वापरतो आहे असे जाणवते. मात्र त्याचा प्रतिकार ती करु शकत नाही आणि या संबंधी कुठलाही तपशील दुसऱ्यादिवशी तिच्या लक्षात नसतो. नाईटक्लबमध्ये दारुमध्ये भेसळ केल्याची अनेक उदाहरणे आहेत. पुरुष स्त्रियांच्या पेयात एखादी गोळी किंवा पावडर टाकतात आणि तिला नशा झाल्याचे कारण सांगून घरी घेवून जातात आणि तिच्यावर बलात्कार करतात. रोहीप्रॉल गैरवापर स्त्री आणि पुरुषांकडूनही वाढत आहे. याचा धोका मुली आणि स्त्रियांना विशेषत्वाने आहे. लैंगिक चाळे करण्यास्तव मुलींनी मुलांना रोहीप्रॉलचा वापर करण्यास प्रोत्साहन दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. रोहीप्रॉल हे शेड्यूल सहा नुसार झोपेची गोळी आहे. विक्रेते बनावट कागदपत्राद्वारे हे ड्रग विकत घेतात आणि त्यानंतर ते रस्त्यावर विकतात.

### ९. क्रिस्टल मेथ-

क्रिस्टल मेथ किंवा मेटाम्फेटामीन ही ॲम्फीली (स्पीड) पासून तयार करण्यात आली होती. मेटाम्फेटामीन हे अनेक प्रकारात येते. ते ओढता येते, फुरफुरता येते, खाता किंवा टोचून घेता येते. वापराच्या वेगवेगळ्या पद्धतींचे वेगवेगळे परिणाम होतात. क्रिस्टल मेथ घरच्या घरी सहजपणे व स्वस्तात तयार करता येवू शकते, ज्यामुळे ड्रगच्या या प्रसारावर नियंत्रण कठिण होते. क्रिस्टल मेथचा अतिरिक्त डोसही सहज होऊ शकतो. कारण शरीर याला पटकन जुळवून घेते आणि त्यामुळे ड्रग रक्तातून निघून जाण्यापूर्वीच त्याचा परिणाम झालेला असतो. परिणाम टिकविण्यासाठी मग व्यक्ती याचा जास्तीत जास्त वापर करतात. मेटाम्फेटामीन हिंसक वागणुकीला आणि अतिशय संतापालाही कारणीभूत ठरतात.

### १०. मारिजुआना-

मारिजुआना म्हणजे कॅनाबिस सटायव्हा वनस्पतींची सुकलेली पाने जॉईंट किंवा नेल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सिगारेटद्वारे ते ओढले जाते. शीतपेयाच्या बाटल्यांपासूनही घरच्या घरी मारिजुआनासाठी नळ्या बनवता येवू शकतात. मारिजुआना अन्नातही मिसळून खाता येवू शकते. मारिजुआनाचे वरचेवर सेवन करणारे सतत झोपेत असल्याप्रमाणे दिसू शकतात. आणि हळू-हळू बोलतात. त्यांचे डोळे रक्तासारखे लाल भडक आणि बाहूल्या प्रसरण पावलेल्या असतात.

### ११. तंबाखू-

भारतात तंबाखूचे उत्पादन व तंबाखुचे सेवन करणाऱ्यांची संख्या खुप मोठी आहे. ग्रामीण भाग वा शहरी भागातून त्याचे विविध प्रकारे सेवन केले जाते. तंबाखूच्या सेवनाने तोंडाचा, घशाचा, फुफ्फुसाचा, पोटाचा, किडनीचा किंवा मुत्राशयाचा इ. कॅन्सर होऊ शकतो. भारतात ५६.४% स्त्रीयांना आणि ४४.९% पुरुषांना तंबाखुमुळे कर्करोग झाल्याचे आढळून आले. तंबाखुमुळे हृदय व रक्तवाहिन्यांचे विकार, हृदयरोग, छातीत दुखणे, मेंदूचा विकार, पायाचा गॅगरीन इत्यादी रोग होऊ शकतात. महाराष्ट्रात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थविक्रिवर बंदी आहे. मात्र केंद्र शासनाला व पूर्वी महाराष्ट्र शासनाला यातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असे.

### १२. दारु-

तंबाखुनंतर दारुचे ग्रामीण व शहरी भागात ही सर्वात जास्त सेवन केले जाते. दारु प्यायल्याने जठरात दाह व सूज, यकृतावर दुष्परिणा झाल्याने भूक मंदावणे, अशक्तपणा वाढणे व काही वर्षांनी यकृत आकसणे व शेवटी त्याचे कार्य मंदावते. शेवटी बरी न होणारी कावीळ होणे, पोटात पाणी होणे व त्यातून मृत्यूही होऊ शकतो. त्याचबरोबर स्वादूपिंडाला आजार, स्नायुंचा कमकुवतपणा, मेंदू व ह्रदयावरील वाईट परिणाम असेही आजार जडतात. गर्भवती स्त्रीने गरोदरपणात दारु पिणे चालू ठेवल्यास कमी वजनाचे मूल जन्माला येणे व मुदतीच्या अगोदर बाळंत होणे यासारखे परिणाम होतात. दारुचे भीषण परिणाम असूनही, भीषण सामाजीक परिणाम असूनही केंद्र वा राज्य शासनास त्यावर पूर्णपणे बंदी घालता आली नाही. शासनाला दारुतून मोठ्या प्रमाणात कराच्या रुपात महसूल प्राप्त होतो. गुजरातसारखे एखादे राज्य सोडल्यास भारतातील इतर कोणत्याही राज्यात दारुबंदीसाठी प्रयत्न केले गेले नाहीत किंवा प्रयत्न असफल तरी ठरले आहेत.

### महाराष्ट्रातील प्रमुख शहरे आणि अंमली पदार्थ विक्री-

भारतातील इतर राज्याप्रमाणेच पुरोगामी महाराष्ट्र ही आज अंमली पदार्थाच्या विळख्यात आहे. किंबहूना असे म्हणता येईल की महाराष्ट्रातूनच अशा अंमली पदार्थाचे सेवन व तस्करी सुरु  झाली असावी. महाराष्ट्रातल्या अशा कांही प्रमुख शहरातील अंमलीपदार्थाची तस्करी वा व्यापार कसा होतो ते पाहता येईल.

### ठाणे-

ठाणे, कळंबा, मुब्रा आणि कल्याण भागातील शाळा व महाविद्यालय परिसरात एम. डी. पावडरचा व्यवसाय तेजीत आहे. 'बुक' या नावाने विद्यार्थ्यांत ही पावडर ओळखली जाते.

### नवी मुंबई-

एज्युकेशनल हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात अभ्यास करताना झोप येवू नये म्हणून अंमली पदार्थाचे सेवन करण्याची सुरु झालेली पद्धत आता व्यसन बनली आहे. 'पायबीच' हा या दलालांचा अड्डा झाला आहे. नवी मुंबईतही 'एम. डी.' ला मागणी आहे.

### पुणे-

शहरातील उच्चभ्रू वर्गातील कांही व्यक्ती, विद्यार्थी यांच्याकडून व्यसनासाठी आता केटामाईन, मॅजिक मशरुम यासारख्या अंमली पदार्थाची मागणी केली जात आहे. गांजाच्या तस्करीसाठीसुद्धा पुणे एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते. पुण्यातील कांही मोठ्या हॉटेल्समध्ये होणाऱ्या पार्ट्यांमध्ये केटामाईन या अंमली पदार्थाचा वापर केल्याचे पोलिसांना आढळून आले आहे. याबरोबर तरुणाईला भूरळ पाडणारे वेगवेगळे 'हुक्का पार्लर' अनेक हॉटेलमध्ये छुप्या पद्धतीने सुरु आहेत.

### नाशिक-

अफू, चरस, गांजा, भांग यासारख्या पारंपारिक अंमली पदार्थाची चलती तर आहेच, आता त्यात हुक्का पार्लरची भर पडली आहे. हुक्का पार्लर सध्या बंद असले तरी हुक्याचे साहित्य शहरात उपलब्ध होऊ शकते. मध्यवस्तीतील भद्रकाली व गोदाकाठ लगतचा कांही भाग त्यांची विक्री केंद्रे म्हणून ओळखली जातात.

### नागपूर-

मोमिनपुरा, हसनबाग, ताजबाग, सदर, मानकापूर, धरमपेठ, एमआयडीसी, बजेरिया, रेल्वेस्थानक परिसरात प्रामुख्याने अंमली पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री होते. नागपूरसह विदर्भात अंमलीपदार्थात सर्वाधिक प्रमाणात गांजा व गर्द विकले जाते मात्र चरस वापरणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

मुंबई-ठाणे परिसरातील ड्रगच्या अधिन झालेल्यांची संख्या साधारणपणे साडेपाच लाखाच्या आसपास आहे. प्रत्येकजन एका दिवसात एक ग्रॅम ड्रग्ज सेवन करतो. म्हणजे मुंबईत एका दिवसात एकूण साडेपाचशे किलो ड्रग्ज सेवन केले जाते अशी माहिती नार्कोटिक कंट्रोल ब्युरोमधील कांही निवृत्त अधिकारी सांगतात. त्यादृष्टीने ड्रग्जची किंमतही प्रचंड असल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते.

## अंमली पदार्थ व कायदा-

१९८५ मध्ये असा कायदा होता की, ड्रग्ज पकडलेल्या व्यक्तीकडे कितीही प्रमाणात ड्रग्ज असले तरी त्याला किमान १० वर्षे तुरुंगवासाबरोबर एक लाख रुपये दंड आणि शिक्षा ठोठावली जायची. तसेच त्यात वाढही होण्याची शक्यता असायची. म्हणजे १० वर्षाचा तुरुंगवास २० वर्षापर्यंत वाढवला जायचा तर एक लाख रुपयाचा दंड दोन लाख रुपयापर्यंत वाढवला जायचा. नंतर २००० साली कायद्यात परिवर्तन झाले आणि त्यात स्मॉल क्वान्टिटी, नॉन कमर्शिअल आणि कमर्शिअल असे प्रकार केले गेले. नॉन कमर्शिअल म्हणजे मीडियम क्वान्टिटी आणि कमर्शिअल म्हणजे लार्ज क्वान्टिटी असा अर्थ घेतला जातो, व त्याप्रमाणे शिक्षा सुनावली जाऊ लागली.

- अंमली पदार्थाची खरेदी करणाऱ्याला एक वर्ष तुरुंगवास आणि दोन हजार रुपये दंड.
- अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्याला त्याच्याकडे असलेल्या अंमली पदार्थाच्या प्रमाणानुसार शिक्षा सुनावली जाते.
- स्मॉल क्वान्टिटी, मिडियम क्वान्टिटी व लार्ज क्वान्टिटी अशी तीन विभागात विभागणी केली आहे.
- स्मॉल क्वान्टिटीमध्ये अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्याला एक वर्ष तुरुंगवास किंवा दहा हजार रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा सुनावल्या जाऊ शकतात.
- मिडिअम किंवा नॉन कमर्शिअल क्वान्टिटीमध्ये अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्याला दहा वर्ष तुरुंगवास किंवा एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
- लार्ज किंवा कमर्शिअल क्वान्टिटीमध्ये अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्याला दहा वर्षापेक्षा जास्त तुरुंगवास किंवा दोन लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
- गुन्हेगाराला तुरुंगवास, दंड की दोन्ही शिक्षा सुनवायच्या याबाबतचा निर्णय त्या-त्यावेळी न्यायालयात घेतला जातो.

## निष्कर्ष-

सदरच्या शोध निबंधातून प्रकर्षाने पुढे आलेले कांही निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. फार पुरातन काळापासून मानवाला अंमली पदार्थाच्या सेवनाची चटक असल्याचे दिसते.
२. पुरातन काळापासून ते आजपर्यंत कोणत्याही काळात कोणत्याही सरकारने अंमली पदार्थाच्या सेवनाला उघड मान्यता दिल्याचे दिसत नाही.
३. अंमली पदार्थाच्या सेवनाने तरुण पिढीवर घातक परिणाम होतात.
४. अंमली पदार्थांपासून महसूल मिळवून देणाऱ्यामध्ये अल्कोहोल व तंबाखूचा वरचा क्रमांक आहे.
५. अंमली पदार्थाच्या तस्करीमध्ये काळ्या पैशाच्या निर्मितीला चालना मिळते.
६. अंमली पदार्थांची अवैध विक्री मोठ्या प्रमाणात मोठ्या शहरातून होताना दिसून येते.
७. अंमली पदार्थांच्या खरेदी-विक्रीवर बंधने घालणारे अनेक कायदे वेळोवेळी सरकारने केले आहेत.
८. वेगवेगळ्या सरकारांनी वेगवेगळ्या अंमली पदार्थांच्या उत्पादनावर निर्बंध घातले आहेत. उदा. गुजरात- दारुबंदी, महाराष्ट्र-तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ
९. अफू, चरस, गांजा अशा तत्सम पदार्थांवर संपूर्ण देशात बंदी घातलेली दिसून येते.

## समारोप-

अंमली पदार्थांचे सेवन व तस्करी याचे जाळे ग्रामीण भागात फारसे दिसून येत नसले तरी शहरात मात्र याचे जाळे बऱ्याचपैकी जाणवते. बॉलीवूड तर नेहमीच अशा अंमली पदार्थाच्या चर्चेत असते. मग त्याचेच अनुकरण तथाकथित उच्चभ्रू मंडळी करताना दिसून येते. तर हिच गोष्ट झिरपत-झिरपत कनिष्ठ वर्गीयांपर्यंत येवून पोहोचली आहे. त्याचे शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक परिणाम माहीत असूनही या पदार्थाची चटक व्यक्तीला स्वस्थ बसू देत नाही. अशा व्यसनी व्यक्तीच्या हातून गंभीर गुन्हेही घडतात. गांजा, चरस, हेरॉईन, कोकेन, मेक्रेडॉन, एलएमडी, एक्सटसी, आईस, एमडी, एन बॉम्ब असे कितीतरी ड्रग्जचे विविध प्रकार आहेत. यातील काहींच उत्पादन भारतातील विशिष्ट भागात तर काहींचे परदेशात होते. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि इराण हा गोल्डन क्रिसेंट भाग म्हणून ओळखला जातो. तर म्यानमार, लाओस आणि कंबोडिया हा गोल्डन ट्रँगल भाग आहे. याच भागातून भारतात ड्रग्जचा शिरकाव होतो. तंबाखूचे कायदेशीर उत्पादन भारतात घेतले जाते तर निकृष्ट दारुचे उत्पादन जसे गावठी दारु, हातभट्टी खोपडी इत्यादीचे

बेकायदेशीर उत्पादन होते आणि ते पिणाऱ्यांची संख्याही जास्त आहे. दारु व तंबाखू उत्पादनातून शासनाला मोठा कर वा महसूल मिळतो म्हणून संपूर्ण भारतात त्यावर बंदी येणे अशक्य वाटते.

तरीही अशा पदार्थाची विक्री, साठा व सेवन होऊ नये म्हणून शासन सर्वोतपरी प्रयत्न करीत असले तरी शासनाचे प्रयत्न तोकडे पडत आहेत. यासाठी समाजातून मोठ्या प्रमाणात जनजागृती होणे गरजेचे आहे. नाही तर याचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, कौटुंबिक परिणाम समाजालाच भोगावे लागणार आहेत.

## संदर्भ ग्रंथ


- भारतातील सामाजिक समस्या, पि. के. कुलकर्णी, विद्याप्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९९८
- कुबेर समूह, अंमली पदार्थाविरुद्ध कुबेरांचे अभियान www.kubergroup.org- ०५ May २०१६
- लोकसत्ता, १ जुलै २०१६
- लोकसत्ता, ३० नोव्हेंबर २०१४
- आरोग्य स्पंदन, अंक पाचवा, मार्च २०१६
- साप्ताहिक, आरोग्यपत्रिका, जानेवारी २०१६
- सोडा व्यसने जगा सुखाने, डॉ. बी. रविंद्र, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, जानेवारी २००३
- मद्यपान : एक भयानक आजार, डॉ. एच. व्ही. सरदेसाई, १९७७
- मादक पदार्थ, डॉ. अंकूश जाधव, १९९२